Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal
Impact Factor 5.69
ISSN No. 2456-1665

# जालना जिल्ह्यातील लोकसंख्येचा अभ्यास

**जाधव अर्चना अमृत**
संशोधक
डॉ .बा .आ .म विद्यापीठ
छ संभाजीनगर

**डॉ . बाबू दिगांबर तोटरे**
मार्गदर्शक
सहायक प्राध्यापक ,
अर्थशास्त्र विभाग ,
जे.ई.एस .कॉलेज जालना

भौगोलिकदृष्ट्या जालना जिल्हा राज्याच्या मध्यभागी येत असल्याने केंद्रीय दळणवळण मंत्रालयाने जालना शहरांजवळील इंदेवाडी या खेडयात उपग्रह अनुश्रवण भूकेंद्र उभारलेले आहेत. अंतराळात सोडलेल्या उपग्रहाशी सातत्याने संपर्क ठेवणे सोईचे ठरते. जालना जिल्हा १९.१ ते २०.३ या उत्तर अंक्षाश व ७५.४ रेखांश ते ७६.४ या पूर्व रेखांशामध्ये वसलेला आहे. जिल्ह्याच्या उत्तर सीमेवर जळगांव, पूर्वेस बुलढाणा, परभणी दक्षिणेकडे बीड व पश्चिमेकडे औरंगाबाद हे जिल्हे वसलेले आहेत. २००१ च्या जनगणनेतील लोकसंख्या दर लक्षात घेऊन केंद्रीय सांख्यिकी संघटनेने वर्ष २०१४ पर्यंतच्या महाराष्ट्राच्या लोकसंख्येची प्रक्षेपित आकडेवारी तयार केली असुन तहसिलवार प्रक्षेपित लोकसंख्येची माहिती व जिल्ह्यातील नागरी व ग्रामीण लोकसंख्या यांचा अभ्यास करण्यात आला आहे .

**संशोधनाची उद्दीष्टे :**

.१. जालना जिल्ह्यातील तहसिलवार प्रक्षेपित लोकसंख्येचा अभ्यास करणे

२. जालना जिल्ह्यातील नागरी व ग्रामीण लोकसंख्येचा अभ्यास करणे

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत शोधनिबंधा करिता द्वितीय साधनसामग्रीचा वापर करण्यात आला असून त्यासाठी जालना जिल्हा परिषदेचे वार्षिक लेख ,मासिके , संदर्भ ग्रंथ, शासकीय प्रकाशाने ,इत्यादीचा वापर करण्यात आला आहे .

**तक्ता क्र. १**

**तहसिलवार प्रक्षेपित लोकसंख्या** **(आकडे हजारांत)**

| वर्ष | जालना | बदनापूर | अंबड | घनसांवगी | भोकरदन | जाफ्राबाद | परतूर | मंठा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| २००१ | ४३७ | १३२ | २०९ | १७४ | २५८ | १३८ | १४६ | १३१ |
| २००२ | ४४४ | १३३ | २१० | १७५ | २६० | १४० | १४७ | १३१ |
| २००३ | ४५१ | १३४ | २१३ | १७६ | २६२ | १४२ | १४८ | १३१ |
| २००४ | ४५८ | १३५ | २१४ | १७६ | २६४ | १४३ | १४८ | १३२ |
| २००५ | ४६५ | १३६ | २१६ | १७८ | २६६ | १४५ | १४९ | १३२ |
| २००६ | ४७२ | १३७ | २१८ | १७९ | २६८ | १४६ | १४९ | १३२ |
| २००७ | ४७९ | १३८ | २२० | १८० | २७० | १४८ | १५० | १३२ |
| २००८ | ४८५ | १३९ | २२१ | १८१ | २७२ | १४९ | १५० | १३२ |
| २००९ | ४९२ | १३९ | २२३ | १८१ | २७३ | १५० | १५० | १३२ |
| २०१० | ४९२ | १४० | २२४ | १८२ | २७४ | १५२ | १५१ | १३२ |
| २०११ | ५०५ | १४० | २२६ | १८२ | २७६ | १५३ | १५१ | १३२ |
| २०१२ | ५११ | १४१ | २२७ | १८३ | २७७ | १५४ | १५१ | १३२ |
| २०१३ | ५१७ | १४१ | २२८ | १८३ | २७८ | १५५ | १५१ | १३२ |
| २०१४ | ५२३ | १४१ | २३० | १८३ | २७९ | १५६ | १५१ | १३२ |

*स्त्रोत :- जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन - २०१३.*

तक्ता क्रमांक १ मध्ये २०१४ पर्यंतची प्रक्षेपित लोकसंख्या दर्शविली आहे. २००१ च्या जनगणनेनुसार जालना जिल्ह्यातील एकूण लोकसंख्येपैकी ३.०८ लक्ष म्हणजे १९.०७ टक्के लोकसंख्या नागरी भागात आहे. तर १३.०५ लक्ष म्हणजे ८०.९३ टक्के एवढी लोकसंख्या ग्रामीण भागात आहे. जनगणना २०११ नुसार संभाव्य लोकसंख्या एकूण १६.१२ लक्षापैकी पुरुष ८.२६ लक्ष तर स्त्रिया ७.८६ लक्ष असून लोकसंचख्येची घनता प्रति २०९ प्रति कि.मी. आहे.

२०११ जनगणनेनुसार जिल्ह्याची एकूण लोकसंख्या १९.५९ लक्ष इतकी आहे. २००१ च्या जनगणनेनुसार ती १६.१२ लक्ष होती. यावरुन जिल्ह्याच्या दशवार्षिक लोकसंख्या वाढीचा दर दरहजारी १५७ येतो. २०११ च्या जनगणनेनुसार एकूण लोकसंख्येपैकी २६.४९% जालना, ७.८५% बदनापूर,

१५.८९% भोकरदन, ८.३३% जाफ्राबाद, ९.०७% परतूर, ८.५५% मंठा, १३.०५% अंबड, १०.७८% घनसांवगी या प्रमाणे तहसीलवार लोकसंख्या आढळते. २००१ च्या जनगणनेच्या तुलनेत २०११ मध्ये एकूण ३.४६ लक्ष एवढया संख्येने जिल्हातील लोकसंख्येत वाढ झालेली आहे. २०११ च्या जनगणनेप्रमाणे जिल्ह्यातील लोकसंख्येची घनता दर चौ.कि.मी. मध्ये २५४ येते. जिल्ह्यात एकूण ९६७ पैकी ९५८ वस्ती असलेली गावे असून दर गावामागे सरासरी लोकसंख्या २०२६ येते.

**तक्ता क्र. २**

**जिल्ह्यातील नागरी व ग्रामीण लोकसंख्या**

| शहराचे / तालुक्याचे नांव | शहरी | | | ग्रामीण | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | पुरुष | स्त्री | एकूण | पुरुष | स्त्री | एकूण |
| जालना | १४७०९२ | १३८४८५ | २८५५७७ | १२१०६९ | ११२३७२ | २३३४४१ |
| भोकरदन | १२७५१ | ११६६५ | २४४१६ | १४८७२२ | १३८१६५ | २८६८८७ |
| अंबड | १५९५० | १५६०३ | ३१५५३ | ११५४३४ | १०८७२२ | २२४१५६ |
| परतूर | १८४०१ | १७४८२ | ३५८८३ | ७२७६५ | ६८९४१ | १४१७०६ |
| बदनापूर | - | - | - | ७९५०० | ७४२७२ | १५३७७२ |
| घनसांवगी | - | - | - | १०८७०५ | १०२४०३ | २११९०८ |
| जाफ्राबाद | - | - | - | ८४४५० | ७८६७० | २८६८८७ |
| मंठा | - | - | - | ८६६३४ | ८०७९३ | १६७२४७ |
| **एकूण** | **१९४१९४** | **१८३२३५** | **३७७४२९** | **८१७२७९** | **७६४३३८** | **१५८१४३७** |

*स्त्रोत:- जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन -२०१३*

तक्ता क्रमांक २ मध्ये जालना जिल्ह्यातील नागरी व ग्रामीण लोकसंख्या दाखविलेली आहे. त्यामध्ये पुरुष व स्त्रीयांचीही लोकसंख्या दाखविलेली आहे. ही लोकसंख्या तालुकानिहाय आहे. जालन्याची शहरी भागातील लोकसंख्या २८५५७७ ही असून त्यापैकी पुरुषांची लोकसंख्या १४७०९२ अशी तर स्त्रीयांची लोकसंख्या १३८४८५ ही आहे. त्याचप्रमाणे ग्रामीण भागातील एकूण लोकसंख्या २३३४४१ अशी असून त्यापैकी पुरुषांची लोकसंख्या १२१०६९ अशी तर स्त्रीयांची लोकसंख्या ११२३७२ ही आहे. भोकरदन शहरी भागातील लोकसंख्या २४४१६ ही असून त्यापैकी पुरुषांची लोकसंख्या १२७५१ अशी तर स्त्रीयांची

लोकसंख्या ११६६५ ही आहे. तर ग्रामीण भागातील एकूण लोकसंख्या २८६८८७ अशी असून त्यापैकी पुरुषांची लोकसंख्या १४८७२२ अशी तर स्त्रीयांची लोकसंख्या १३८१६५ ही आहे. अंबडच्या शहरी भागातील लोकसंख्या ३१५५३ ही असून त्यापैकी पुरुषांची लोकसंख्या संख्या १५९५० अशी तर स्त्रीयांची लोकसंख्या १५६०३ ही आहे. तर ग्रामीण भागातील एकूण लोकसंख्या २२४१५६ अशी असून त्यापैकी पुरुषांची लोकसंख्या ११५४३४ अशी तर स्त्रीयांची लोकसंख्या १०८७२२ ही आहे. परतूर शहरातील लोकसंख्या ३५८८३ ही असून त्यापैकी पुरुषांची लोकसंख्या १८४०१ अशी तर स्त्रीयांची लोकसंख्या १७४८२ ही आहे, तर ग्रामीण भागातील एकूण लोकसंख्या १४१७०६ अशी असून त्यापैकी पुरुषांची लोकसंख्या ७२७६५ अशी तर स्त्रीयांची लोकसंख्या ६८९४१ ही आहे. बदनापूर तालुक्यात एकूण ग्रामीण भागातील एकूण लोकसंख्या १५३७७२ अशी असून त्यापैकी पुरुषांची लोकसंख्या ७९५०० अशी तर स्त्रीयांची लोकसंख्या ७४२७२ ही आहे. घनसावंगी तालुक्यात एकूण ग्रामीण भागातील एकूण लोकसंख्या २११९०८ अशी असून त्यापैकी पुरुषांची लोकसंख्या १०८७०५ अशी तर स्त्रीयांची लोकसंख्या १०२४०३ ही आहे.जाफ्राबाद तालुक्यात एकूण ग्रामीण भागातील एकूण लोकसंख्या २८६८८७ अशी असून त्यापैकी पुरुषांची लोकसंख्या ८४४५० अशी तर स्त्रीयांची लोकसंख्या ७८६७० ही आहे. मंठा तालुक्यात एकूण ग्रामीण भागातील एकूण लोकसंख्या १६७२४७ अशी असून त्यापैकी पुरुषांची लोकसंख्या ८६६३४ अशी तर स्त्रीयांची लोकसंख्या ८०७९३ ही आहे.

**सारांश**

२००१ च्या जनगणनेच्या तुलनेत २०११ मध्ये एकूण ३.४६ लक्ष एवढया संख्येने जिल्हातील लोकसंख्येत वाढ झालेली आहे. तसेच जालना जिल्ह्याचे नागरी व ग्रामीण जीवन वरील आलेखावरुन स्पष्ट होत असून त्यामध्ये एकूण शहरी लोकसंख्या ७७४२९ अशी आहे. त्यामध्ये पुरुषांची लोकसंख्या १९४१९४ ही आहे तर स्त्रीयांची लोकसंख्या १८३२३५ ही आहे. तर ग्रामीण भागातील एकूण लोकसंख्या १५८१४३७ ही असून त्यापैकी पुरुषांची लोकसंख्या ८१७२७९ ही आहे तर स्त्रीयांची लोकसंख्या ७६४३३८ अशी आहे.

**संदर्भ :**

१.देविसिंग चौहान, मराठवाडा : काल आणि आज, संपादक भगवान काळे, संकेत प्रकाशन, जालना.

२.जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, जिल्हा जालना, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन.२०१३

3. प्रा. ए. बी. सवदी- द मेगा स्टेट महाराष्ट्र निराली प्रकाशन, पुणे.

४. http://district.mahanic.in